# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस्. के. बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२८.

दूरध्वनी : ०२२ - ६२४९ ११११ / ११२

ईमेल : admin@siddhivinayak.org I info@siddhivinayak.org

वेबसाइट : www.siddhivinayak.org


श्री सिद्धिविनायक

पूर्नानिविदा

## श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिरात लागणारे हार – फुले खरेदी करण्यासाठी ई – निविदा मागविण्याबाबत.

---

हार व फुले पुरवठा कालावधी

जुलै २०२५ ते ३१ मार्च २०२७

## श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास,प्रभादेवी,मुंबई ४०००२८

फोन नंबर – ०२२ – ६२४९११६०

: ई – निविदा सूचना :

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिरात लागणारे हार फुले खरेदी करण्यासाठी ई – निविदा मागविण्यात येत आहेत. ई निविदेबाबतची सविस्तर माहिती (अटी व शर्ती) तसेच निविदा अर्ज डाऊनलोड करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर किंवा www.siddhivinayak.org या न्यासाच्या वेबसाईटला भेट द्यावी.

- ई निविदा प्रसिद्धीचा दिनांक – शनिवार, दि.१२ जुलै २०२५
- ई निविदा स्वीकारण्याचा अंतिम दिनांक व वेळ – शनिवार, दि. १९ जुलै २०२५ दु २.०० पर्यंत
- तांत्रिक निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ – सोमवार, दि. २१ जुलै २०२५ दु २.३० वा.
- मूल्य निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ – सोमवार, दि. २१ जुलै २०२५ २०२५ दु ३.०० वा
- स्थळ – तिसरा मजला , मंदिर न्यास कार्यालय.

ई- निविदेसाठी डिजिटल सिग्निचर प्राप्त करणे आवश्यक असेल.

निविदेची किंमत / शुल्क ना परतावा स्वरूपाचा असेल.

Vpatil

( वीणा पाटील )

कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई – ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

**श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिरात लागणारे हार फुले खरेदी करण्याकरिता ई – निविदा मागविण्याबाबत.**

**खरेदी विभागात हार व फुले पुरवठा कालावधी**
**जुलै २०२५ ते ३१ मार्च २०२७**

| अ.क्र | तपशील | पान क्रमांक |
|---|---|---|
| १ | ई निविदा मागविण्याबाबतची माहिती. | ३ |
| २ | ई निविदेच्या अटी व शर्ती. | ४-७ |
| ३ | निविदाधारकाने (Technical Bid) करीता ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे. | ८ |
| ४ | निविदाधारकाची आर्थिक उलाढाल | ११ |
| ५ | हमीपत्र (नमुना) | ९ |
| ६ | निविदाधारकाबाबतची माहिती (नमुना) | १० |
| ७ | निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाचे बीड ऑफ कोटेशन (BOQ) तपशील. | १२-१३ |

| अ.क्र | ई – निविदा मागविण्याबाबतची माहिती |
|---|---|
| १ | श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिरात लागणारे हार व फुले पुरवठा करण्याकरीता ई – निविदा ऑनलाईन भरावयाची आहे. |
| २ | ऑनलाईन इंटरनेट बँकींगकरीता एस.बी.आय बँक किंवा इतर इंटरनेट बँकींगकरीता एस.बी.आय MOPS **(Multiple Option Payment System)** चा वापर करावा. |
| ३ | निविदा अपलोड करतेवेळी निविदा प्रपत्राची रक्कम **(Tender Fee)** रु ३००० /- व बयाणा रक्कम **(Emd)** रु १,००,००० /- इतकी ऑनलाईन इंटरनेट बँकींगमार्फतच जमा करावा लागेल. |
| ४ | ई – निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बँकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदा प्रपात्राची रक्कम **(Tender Fee)** व बयाणा रक्कम **(Emd)** पावती प्रत स्कॅन करून अपलोड करावयाची आहे. बयाणा **(Emd)** रक्कमेवर कोणतेही व्याज अनुज्ञय राहणार नाही. |
| ५ | स्थानिक सहकारी बँक , पतसंस्था इत्यादींचे धनाकर्ष व धनादेश ग्राह्य धरले जाणार नाही. |
| ६ | अपलोड करावयाची तांत्रिक निविदेच्या **(Technical Bid)** प्रत्येक पानावर निविदाधारकाची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का असावा. |
| ७ | ई – निविदेसोबत पान क्र ८ वर नमूद केलेली कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. त्यानंतर मूळ निविदा **(Commercial)** उघडण्यात येईल. |
| ८ | ई – निविदाधारकाने तांत्रिक निविदा व वित्तीय निविदा **(BOQ)** भरतांना माहिती अपूर्ण ठेवल्यास / राहिल्यास त्या ई – निविदा कोणतेही कारण न देता रद्द समजण्यात येतील. त्याबद्दलचा अंतिम निर्णय हा श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास समितीने राखून ठेवला आहे. |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

| अ .क्र | अटी व शर्ती |
|---|---|
| १ | कमी जास्त दराची कोणतीही ई – निविदा स्विकारण्याचा / नाकारण्याचा अथवा सर्व ई – निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार न्यासाने राखून ठेवला आहे. त्याबद्दलची कारणे / स्पष्टीकरणे देणे श्रीसिद्धिविनायक न्यासास बंधनकारक राहणार नाही. |
| २ | ज्याची निविदा मान्य होईल त्या निविदाधारकाने कार्यादेश मिळाल्यापासून १० दिवसाच्या आत वार्षिक निविदा रक्कमेच्या १,००,०००/- बयाणा (Emd)रक्कम म्हणून १ वर्षासाठी न्यासाकडे जमा केली पाहिजे. निविदेसोबत ऑनलाईन इंटरनेट बँकिंगमार्फत सादर केलेली रक्कम वजा करून उर्वरित रक्कम जमा करावी लागेल. निविदेत नमूद केलेल्या कामाबद्दल कोणतेही तक्रार नसेल तर कामाचा कालावधी संपल्यानंतर बयाणा रक्कम परत केली जाईल. बयाणा (Emd) रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही. |
| ३ | श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिरात लागणारे हार फुले खरेदी मागणी केली जाईल. पुरवठा आदेशात नमूद परिमाणात हार फुले घेतली जातील. जास्त किंवा कमी प्रमाणातील स्विकारली जाणार नाही. |
| ४ | पुरवठादाराने पुरवठा आदेश निर्गमित झाल्यापासून मंदिरात खरेदी विभागात हार फुले पुरवठा करणे आवश्यक असेल. विहित मुदतीत हार फुले पुरवठा न केल्यामुळे न्यासाची अडचण / नुकसान होऊ नये म्हणून न्यासाला बाजारभावाने आवश्यकतेनुसार किंवा पुरवठा आदेशात नमूद परिमाणाचे हार फुले पुरवठा खरेदी करण्याचे अधिकार / मुभा असेल. बाजारभावाने खरेदी केल्यामुळे जादा अदा केलेल्या रक्कमेची भरपाई निविदाधारकास करावी लागेल.सदर भरपाई देयकाच्या रक्कमेतून वा बयाणा रक्कमेतून करण्यात येईल. |
| ५ | पुरवठादाराने हार व फुले पोहोच स्वखर्चाने श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास,प्रभादेवी,दादर,मुंबई येथे न्यासाचे पुजारी विभागात केली पाहिजे. श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून मालाच्या वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही. खरेदी विभागात हार व फुले उतरविण्याची वाराई आपणास द्यावी लागेल. |
| ६ | खराब व नाशवंत दर्जाची हार व फुले स्विकारली जाणार नाही. अशा प्रकारची मंदिरात हार व फुले पुरवठा केल्यास ते स्वखर्चाने परत घेऊन जाणे हे आपणावर बंधनकारक राहील. हार व फुले पुरवठाची अदायगी केली जाणार नाही. |

| अ.क्र | अटी व शर्ती |
|---|---|
| ७ | निविदाप्रक्रियेत स्विकृत झालेले दर वर्षभरासाठी कायम राहतील. मान्य दरामध्ये ठेका कालावधीत कोणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही. आपण मंदिरात पुजारी विभागात हार व फुले पुरवठा करावयाचा नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास आपली पूर्णतः अथवा अंशतः बयाणा रक्कम न्यासाकडे जमा करण्यात येईल. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील. |
| ८ | बिल सादर करतांना बिलात खरेदी आदेशातील वर्णनाप्रमाणेच मालाचे नावाचे तपशील असणे आवश्यक आहे. संक्षिप्त स्वरूपात उल्लेख करू नये अन्यथा देयक अदा केले जाणार नाही. |
| ९ | पुरवठा करण्यात आलेल्या हार व फुले पुरवठाचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झल्यावरच देयक अदा केले जाईल. पुरवठ्याबाबत आगाऊ रक्कम दिली जाणार नाही. |
| १० | कर वगळून सर्व खर्चासहित दराचा उल्लेख करावा व त्यावर जी.एस.टी आकारण्यात यावा. सरकारी नियमानुसार आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल. |
| ११ | निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसात समक्ष येऊन रु १०० / - चा गैरन्यायिक STAMP पेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील. परंतु अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदाधारकाने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्ती नुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील. |
| १२ | पुरवठा आदेश व बिलाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदरील व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय संवाद कक्षेत राहील. |
| १३ | सुरक्षा अनामत रक्कम माल पुरवठा करार संपल्यानंतर ६० दिवसानंतर परत केली जाईल. बयाणा रक्कमेवर कोणतेही व्याज मिळणार नाही. |
| १४ | श्रीसिद्धीविनायक गणपती मंदिर न्यास आवश्यकतेनुसार एक किंवा एकापेक्षा जास्त कंत्राटदाराला कार्यादेश देऊ शकतो. कोणीही एकापेक्षा जास्त निविदा भरू नये. |
| १५ | ई – निविदा भरतांना मूळ किंमत भरावी. कर अतिरिक्त राहील. |
| १६ | नियमानुसार आवश्यक आयकर रक्कमेची कपात करण्यात येईल. तसेच सर्व प्रकारचे कर अदा करणेची जबाबदारी निविदाकार यांची राहील. |

| अ.क्र | अटी व शर्ती |
|---|---|
| १७ | कार्यादेशाप्रमाणे पुरवठा करीत असलेल्या मंदिरात पुजारी विभागात हार व फुले यांचे कधीही परिक्षण करण्याचा न्यासाला पूर्ण अधिकार राहील. |
| १८ | पुरवठा करावयाच्या कामाच्याबाबतीत विविध नियम , वैधानिक बाबी निविदाधारक यांच्यावर बंधनकारक राहील. |
| १९ | ई – निविदेत नमूद पुरवठा करण्याच्या कामामध्ये कपात करणे किंवा वाढविणे याचा अधिकार न्यासाकडे राहील. |
| २० | न्यासास हार व फुले पुरवठा करण्याच्या कामात चालढकल केल्यास न्यास कोणतीही पूर्वसूचना न देता निविदा रद्द करेल व निविदाधारकाची बयाणा रक्कम (Emd) जप्त करण्यात येईल. |
| २१ | ई – निविदेत नमूद केलेल्या कामासाठी निविदाधारक यांनी दुसऱ्या उप निविदाधारकाला काम दिल्याचे आढळल्यास निविदाधारकाची निविदा रद्द करण्यात येईल. |
| २२ | **NIT DOCUMENT** मध्ये नमूद केलेले काम गुणवत्तेच्या आधारावर देण्यात येणार आहे. त्यासाठी ई – निविदा धारकांनी पृ क्र ८ मध्ये दर्शवलेली कागदपत्रे साक्षांकित करून त्याचा संच न्यासास सादर करणे आवश्यक आहे. |
| २३ | सदरची ई -निविदा कार्यादेश नसून फक्त बीड ऑफ कोटेशन (BOQ) मागविण्यासाठी आहे. |
| २४ | ई – निविदेमधील अटी व शर्तीचा व कागदपत्रांचा अभ्यास करून ई – निविदा सादर करावी. ई - निविदेसंदर्भात काही शंका असेल तर त्यांनी श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास,प्रभादेवी,मुंबई कार्यालय दूरध्वनी क्रमांक ६२४९११६० वर संपर्क साधावा. |
| २५ | ई – निविदाधारकाला पुजेकरीता फुले पुरवठा करण्याच्या कामाचा मागील ३ वर्षाचा अनुभव असावा तसेच त्यांची सरासरी रु २५ लक्षापेक्षा जास्त उलाढाल असावी. |
| २६ | निविदाकारास कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्थेमध्ये सदरील कामाच्या अनुशंगाने त्यांना काळया यादीत टाकलेले नाही किंवा त्यांच्याविरुद्ध न्यायालयात कोणतेही प्रकरण दाखल झालेले नाही वा प्रलंबित नाही याबाबतचे कायदेशीर हमीपत्र सादर करणे आवश्यक राहील. |

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

| अ.क्र | अटी व शर्ती |
|---|---|
| २७ | मूल्य निविदेत नमूद मुल्यानुसार तांत्रिक निविदेतील कागदपत्रांची पूर्तता होत नसल्याचे निदर्शनास आल्यास मूल्य निविदा उघडल्यानंतर देखील निविदाकारास अपात्र ठरविण्याचे अधिकार न्यासास राहतील. |
| २८ | हार व फुले पुरवठा वेळेतच होण्यासाठी हार व फुले पुरवठा करणारे निविदाधाराक /उत्पादक हे श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर, प्रभादेवी पासून ५० कि. मी. परिक्षेत्रातील असावेत. |
| २९ | ज्या दिवशी ई – निविदा उघडण्यात येणार आहे त्या दिवशी ई – निविदेद्वारे अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सांक्षांकित प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल. |
| ३० | कोणतेही कारण न देता ई – निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल. |
| ३१ | उपरोक्त अटी व शर्तीत काही बदल , सुधारणा करण्याचा ,शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहित करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट / अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाही. |
| ३२ | संकेतस्थळाच्या माहितीकरीता टोल फ्री क्रमांक १८०० – ३०७० – २२३२, टोल फ्री मो. क्र.७८७८००७९७२ |

आपली,

( वीणा पाटील )
कार्यकारी अधिकारी

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई - ४०००२८
S. K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-400028 ( Controlled by Govt. of Maharashtra)
Tel : 022 - 2422 4438 Fax : 022 - 2422 1558 www.siddhivinayak.org admin@siddhivinayak.org

# निविदाधारकाने ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावयाची कागदपत्रे

**खालील तपशीलाप्रमाणे कागदपत्रे तांत्रिक निविदा (Technical Bid) ऑनलाईन स्कॅन करून अपलोड करावीत.**

| अ.क्र | अपलोड करावयाच्या कागदपत्रांचा तपशील |
|---|---|
| १ | ई – निविदेसोबत निविदेची किंमत / शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बँकेक पावती पत्र. |
| २ | बयाना रक्कम (EMD) केल्याबाबतची इंटरनेट बँकेकडील पावतीची प्रत. |
| ३ | कंपनी नोंदणी दाखला/ Shop Act license / गुमास्ता लायसन्स/ उद्यम प्रमाणपत्र /ट्रेडिंग लायसन्स. |
| ४ | आयकर नोंदणी पॅन कार्ड. |
| ५ | अनुभव दाखला. |
| ६ | हमी पत्र |
| ७ | निविदा उघडण्याच्या वेळी कंपनी / संस्थेमार्फत पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी संदर्भात त्यांचे नावाचे प्राधिकर पत्राची प्रत. |
| ८ | मूळ निविदा ( वाणिज्य Commercial ) BOQ |
| ९ | अपलोड केलेल्या कागदपत्रांचा एक संच न्यासास सादर करावा. |

( लेटरहेडवर )

## हमी पत्र

दिनांक - / /२०२५

प्रति,
कार्यकारी अधिकारी
श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास,
प्रभादेवी , मुंबई – २५

महोदया,

मी / आम्ही ................................................................................................ खालील निम्न स्वाक्षरीकार याद्वारे घोषित करतो की,

१. मी / आम्ही कागदपत्रे , अटी व शर्ती , अन्य बाबी तपासून त्याबाबत खात्री केली असून या विषयी आमची कोणतीही शंका नाही.

२. मी / आम्ही नमूद केलेला दर हा मूळ दर व अधिक कर ( जी.एस.टी ) असा आहे.

३. आमची निविदा स्विकृत केल्यास आम्ही कराराच्या संपूर्ण कालावधीत न्यासाने विहित केल्यानुसारची रक्कम देण्यास बांधील आहोत.

४. ई – निविदेत नमूद केल्याप्रमाणे हार व फुले पुरवठा करणे आमच्यावर बंधनकारक राहील.

५. आम्हास माहित आहे कि ,निविदा स्विकृत करण्यासंदर्भात न्यासास संपूर्ण अधिकार आहे. तसेच कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार न्यासास आहे.

६. आम्ही याद्वारे हमी देतो की, शासकीय/निमशासकीय/सार्वजनिक उपक्रम यांनी यापूर्वी आमच्या मालाचा पुरवठा करण्यासंदर्भात प्रतिबंधात्मक कारवाई आमच्या विरुद्ध केलेली नाही किवा काळया यादीत नावं टाकलेलं नाही.

७. निविदेसोबतची सर्व कागदपत्रे आम्ही काळजीपूर्वक वाचली असून निविदेतील अटी व शर्ती तसेच अन्य बाबी आम्हांस मान्य असून त्या बंधनकारक आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का

( लेटरहेडवर )

## निविदाधारकाची माहिती

| | | |
|---|---|---|
| १) | फर्मचे नाव | : .................................................................................. |
| २) | पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता | : .................................................................................. |
| | | .................................................................................. |
| ३) | दूरध्वनी क्रमांक | : .................................................................................. |
| | मोबाईल क्रमांक | : .................................................................................. |
| | फॅक्स क्रमांक | : .................................................................................. |
| | ई – मेल | : .................................................................................. |
| ४) | संपर्कासाठी व्यक्तीचे नाव | : .................................................................................. |
| ५) | मोबाईल क्रमांक | : .................................................................................. |
| ६) | जी.एस.टी क्रमांक | : .................................................................................. |
| ७) | आयकर नोंदणी पॅन क्रमांक | : .................................................................................. |

निविदाधारकाची सही व शिक्का

( सी.ए यांच्या लेटरहेडवर )

# वार्षिक आर्थिक उलाढालीबाबतचे प्रमाणपत्र

दाखला देण्यात येतो की, मे. ..........................................................................................................

यांच्या व्यवसायाची वर्ष (२०२१-२०२२,२०२२-२०२३,२०२३-२४) या आर्थिक वर्षाची उलाढाल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कालावधी | वार्षिक आर्थिक उलाढाल |
|---|---|---|
| १ | वर्ष २०२१ – २०२२ | |
| २ | वर्ष २०२२ – २०२३ | |
| ३ | वर्ष २०२३ – २०२४ | |
| | एकूण उलाढाल | |
| | सरासरी वार्षिक उलाढाल | |

दिनांक :-  /  /२०२५

ठिकाण :  /  /२०२५

लेखापरीक्षकाची सही / चार्टड अकाऊंट
( नाव / सही शिक्का )

नोंदणी क्रमांक :-

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई

## मूळ दरपत्रक

निविदापत्रकामध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

निविदाधारकाचे नाव : ________________________________

निविदाधारकाचा कायमचा पत्ता : ________________________________

निविदाधारकाचा नोंदणी क्रमांक : ________________________________

जी एस टी क्रमांक : ________________________________

## BOQ

| A | B | C | D | | E | F | G |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | पूजेच नांव | साहित्यांचा तपशील (फुले, हार व पाने इत्यादी ) | दर प्रति पूजा साहित्य, संच (सर्व कर वगळून) | | अंदाजे वार्षिक (दिवस) | अंदाजे वार्षिक (पूजा) | एकूण किंमत (सर्व कर वगळून) G = (D x E) / G = (D x F) |
| | | | २०२५–२६ | २०२६–२७ | | | |
| १ | **पंचामृत पूजा प्रत्यक्ष बसून पुजा** दररोज सकाळी | मिक्स फुले – २किलो (अष्टर,बीजली,शेवंती,कापरी गोंडा) पांढरी फुले – पाव किलो (कागडा,मोगरा,जुई,निवाळी) दुर्वा जुडी–२०नग,जास्वदं फुले–१००नग,विडयाची पाने–१००नग | | | ३६५ | – | |
| २ | **सहस्त्रनामावली पूजा, प्रत्यक्ष बसून पुजा** नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य – मिक्सफुले – दिड किलो, (अष्टर,बीजली,शेवंती,कापरीगोंडा) कनेरी गुलाबी फुले – (१००० नग) पांढरी फुले – २५०ग्रॅम, (कागडा,मोगरा,जुई,निवाळी), दुर्वा जुडी – ३नग, चाफा फुले – २०नग, ३ फुटांचा गुलाबाच्या पाकळयांचा हार – १ नग | | | – | ६०० | |
| ३ | **सहस्त्रावर्तन पूजा, प्रत्यक्ष बसून पुजा** नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य – मिक्सफुले – पाव किलो, (अष्टर,बीजली,शेवंती,कापरीगोंडा) पांढरी फुले – १००ग्रॅम,(कागडा,मोगरा,जुई,निवाळी) दुर्वा जुडी – ३नग,जास्वदं फुले– १०नग,चाफा फुले– २०नग, | | | – | ५०० | |
| ४ | **श्री सत्यनारायण महापूजा** नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य – केळीचे छोटे खांब – ४ नग, आंबा डहाळे – १ नग, दुर्वा जुडी – १ नग, तुळस – ३ मोठे बंडल ( १००० नग मंजीरी देठ तुळस), मिक्स फुले – पाव किलो,(जास्वंद,बीजली,शेवंती) | | | – | ८०० | |
| ५ | **श्री सत्यविनायक महापूजा** नोंदणी करण्यात आलेले दिवस | एका पूजेचे साहीत्य – केळीचे छोटे खांब – ४ नग, आंबा डहाळे – १ नग, दुर्वा जुडी – १५ नग, मिक्स फुले – पाव किलो,(जास्वंद,बीजली,शेवंती) | | | – | १०० | |

# BOQ

| A | B | C | | D | E | F | G |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | पूजेच नांव | साहित्यांचा तपशील (फुले, हार व पाने इत्यादी ) | दर प्रति पूजा साहित्य, संच, (सर्व कर वगळून) वर्ष२५–२६ | दर प्रति पूजा साहित्य, संच, (सर्व कर वगळून) वर्ष२६–२७ | अंदाजे वार्षिक (दिवस) | अंदाजे वार्षिक (पूजा) | एकूण किंमत (सर्व कर वगळून) G = (D x E) / G = (D x F) |
| ६ | **"श्री"ची महापूजेकरीता फुले व इतर देवतांसाठी फुलांचे हार**<br>दररोज<br>सकाळ व संध्याकाळ | मिक्स फुले – १ किलो (बीजली,शेवंती,कापरी गोंडा),<br>पांढरी फुले – १०० ग्रॅम,(कागडा,मोगरा,जुई,निवाळी)<br>दुर्वा जुडी –५नग,बेलाची पाने –१५नग,केळीचे छोटे खांब –४ नग,<br>अष्टर फुले – ५०नग, विडयाची पाने– ३०नग, तुळस – १बंडल,<br>खालीलप्रमाणे जुई,मोगरा,सायली इ.ऋतुप्रमाणे असलेली फुलांचे हार<br>१)साडेतीन फुट – ४ नग, २)अडीच फुट – ४ नग,<br>३)दिड फुट – ८ नग, ४)एक फुट – ८ नग, | | | ३६५ | – | |
| ७ | **श्री गणेश याग (हवन) पूजा**<br>नोंदणी करण्यात आलेले दिवस | केळीचे छोटे खांब – ८ नग,<br>आंबा डहाळे – ५ नग, दुर्वा जुडी– २० नग, तुळस – १मोठे बंडल (३५० नग मंजीरी देठ तुळस), बेलाची पाने – ५० नग,<br>मिक्स फुले – २किलो,(चाफा,जास्वंद,बीजली,शेवंती,अष्टर)<br>पांढरी फुले – १००ग्रॅम,(कागडा,मोगरा,जुई)<br>शोभेची फुले – २जुडी,(ग्लॅडो,गोल्डन,रजनीगंधा)<br>झेंडूच्या फुलांचे साडेचार फुट तोरण – १नग | | | – | ६० | |
| ८ | **श्री गणेश उत्सव पूजा**<br>नोंदणी करण्यात आलेले दिवस | केळीचे छोटे खांब – ८ नग,<br>आंबा डहाळे – ५ नग, दुर्वा जुडी – ५० नग, तुळस – ३मोठे बंडल (३५० नग मंजीरी देठ तुळस), बेलाची पाने – २५०ग्रॅम,<br>मिक्स फुले – ३किलो,(चाफा,जास्वंद,बीजली,शेवंती,अष्टर)<br>पांढरी फुले – २५०ग्रॅम,(कागडा,मोगरा,जुई) जास्वंद – ३० नग,<br>शोभेची फुले – २जुडी,(ग्लॅडो,गोल्डन,रजनीगंधा)<br>झेंडूच्या फुलांचे साडेचार फुट तोरण – १नग | | | – | १० | |
| ९ | **रूईची पाने**<br>दर शनिवार | रूईची पाने –<br>२००० नग | | | ५२ | – | |
| | | | | | | एकूण किंमत **(सर्व कर वगळून)** | |

टीप – वरिल तक्त्यातील प्रत्येक क्रमांका समोरील साहित्याच्या रकान्यात नमूद केलेले साहित्य हे त्या त्या पूजेनूसार एक संच आहे. दरपत्रकधारकाने दरपत्रक भरतेवेळी संपूर्ण संचाकरीता दर सादर करावायाचे आहे.

निविदाधारकाची सही व शिक्का